Session : 6
Date: 11/09/25
News : Sakal

# राजराजेश्वरी शाळेत सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन



**सोलापूर**

विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या संगणक शास्त्र विभागाच्यावतीने सायबर शिक्षा व सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. संगणक शास्त्र विभागातील सुस्मिता राठोड व श्रुती गणपा या विद्यार्थिनींनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या ऑनलाईन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल उदाहरणाद्वारे माहिती दिले. फसवणुक होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती दिले. मोबाईलवर आलेला ओटीपी कोणास सांगू नये. अनोळखी नंबर वरुन आलेले फोन कॉलची पडताळणी करुन घ्यावी. व्हाट्सअप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्रॉंग वापरुन आपली माहिती सुरक्षित करावी. आपल्या माहितीची जबाबदारी आपली असते.हे ध्यानात ठेवाव्यात. मोबाईल, कम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी साधनावर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे म्हणून प्रत्येकांनी सावधानासह जागरुक असावे असे त्या सांगितल्या. यासंबंधी विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, सर्व शिक्षक, शिक्षिकासह शाळेतील ३५८ विद्यार्थी उपस्थित होते. सहशिक्षिका वैशाली गुजर यांनी आभार मानले